# निशाणी क्रमांक २० वरील एकत्रीत आदेश

( इंदुबाई व ईतर विरूद्ध रतनबी व ईतर )

१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. २ च्या वतीने त्यास कैफीयत दाखल करणेसाठी झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्ज व त्यावर वादींचे दाखल केलेले म्हणणे वाचले.

३. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादींना कैफियत दाखल करण्यास विलंब झालेला आहे. प्रतिवादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. २ ही आजारी असल्याचे तिस कैफियत दाखल करण्यास उशीर झालेला आहे.

४. प्रस्तुत दावा वादींनी प्रतिवादींविरुद्ध निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. वादींनी सदर अर्ज मंजूर करण्यास हरकत घेतलेली आहे. तथापी, दाव्याचे स्वरुप विचारात घेता आणि दावा गुणदोषावर अंतीमतः निर्गत करण्याच्या दृष्टीने प्रतिवादी क्र. २ हिस तिची कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करणे गरजेचे आहे.

५. जरी, प्रतिवादी क्र. २ हिस तिची कैफियत दाखल करण्यास उशीर झालेला असला तरी, न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादी क्र. २ वर खर्च लादून तिची कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करणे न्यायतत्वानुसार योग्य व उचीत होईल. सबब, सर्व बाबींचा सारासार विचार करता प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. २ वर खर्च लादून मंजुर करणे न्यायोचीत होईल. करीता, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**आदेश**

०१. अर्ज नि. क्र. २० खर्च म्हणुन रक्कम रू. ३००/– प्रतिवादी क्र. २ ने वादींना एकत्रीतरित्या देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

०२. प्रतिवादी क्र. २ हिस तिची कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येवून खर्चाची रक्कम वादींना दिल्यानंतर तिच्या वतीने दाखल करण्यात आलेली कैफियत स्वीकारण्यात येते.

Digitally signed by VAIBHAV VASANTRAO JOSHI
Date: 2025.03.18 17:37:07 +0530

( व्ही. व्ही. जोशी )
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जामखेड.

दिनांकः १८/०३/२०२५.